सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक सीटीई–२८१९ प्र. क्र.११२/ पोल-३, दि. २७/०३/२०२६

**विषय**:- नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयातील सूरजागड येथील १) नेंडेर व २) येलचील या ०२ सशस्त्र पोलीस मदत केंद्रासाठी नव्याने निर्माण केलेल्या अस्थायी १०० पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक सीटीई–२८१९ प्र. क्र.११२/ पोल-३, दि. २७/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२७१८५५३८४२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 01-04-2026 18:09:14

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
अपर पोलीस महासंचालक, (विशेष कृती) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
पोलीस महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली
पोलीस अधीक्षक, गडचिरोली
कार्यासन अधिकारी, का क्र.२६-ब

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड येथील १) नेंडेर व २) येलचील या ०२ सशस्त्र पोलीस मदत केंद्रासाठी नव्याने निर्माण केलेल्या अस्थायी १०० पदांना मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीटीई-२८१९/प्र.क्र.११२/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च, २०२६

**वाचा:-**

१) शासन निर्णय,गृह विभाग क्र.अेपीओ-२८१७/प्र.क्र.१/पोल-३, दि.१४.०९.२०१८.
२) शासन निर्णय,गृह विभाग क्र.अेपीओ-२८१९/प्र.क्र.११२/पोल-३, दि.२१.०९.२०२०.
३) शासन निर्णय,गृह विभाग क्र.अेपीओ-२८१९/प्र.क्र.११२/पोल-३, दि.२६.०३.२०२१.
४) शासन निर्णय,गृह विभाग क्र.अेपीओ-२८१९/प्र.क्र.११२/पोल-३, दि.३०.०९.२०२१.
५) शासन निर्णय,गृह विभाग क्र.सीटीई-२८१९/प्र.क्र.११२/पोल-३, दि.१७.०९.२०२५.
६) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/पो.अ.गडचिरोली/ /१००पदे/मुदतवाढ/२८/२०१९, दि.०५.०२.२०२६.
७) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.२८.०२.२०२६.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय, गृह विभाग क्र.अेपीओ-२८१७/प्र.क्र.१/पोल-३, दिनांक १४.०९.२०१८ अन्वये नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयातील सुरजागड येथील लोखंडाच्या खाणीच्या संरक्षणासाठी १) नेंडेर व २) येलचील ०२ सशस्त्र पोलीस मदत केंद्राची निर्मिती करण्यास व या ०२ सशस्त्र पोलीस मदत केंद्राकरिता प्रत्येकी ५ पोलीस उप निरीक्षक व ४५ पोलीस शिपाई अशा एकूण १०० पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२. उपरोक्त संदर्भ क्र.०५ येथील शासन निर्णय, दि.१७.०९.२०२५ व्दारे उक्त पदांना दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे. उपरोक्त संदर्भ क्र.०६ येथील दि.०५.०२.२०२६ रोजीच्या पत्राव्दारे पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय यांनी उक्त पदांना दि.०१.०३.२०२६ पासून पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

३. उपरोक्त दोन सशस्त्र पोलीस मदत केंद्रासाठी निर्माण करण्यात आलेल्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| **अ) नेंडेर सशस्त्र पोलीस मदत केंद्र** | | |
| १. | पोलीस उपनिरीक्षक | ०५ |
| २. | पोलीस शिपाई | ४५ |

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| एकूण | | ५० |
| **ब) येलचील सशस्त्र पोलीस मदत केंद्र** | | |
| १. | पोलीस उपनिरीक्षक | ०५ |
| २. | पोलीस शिपाई | ४५ |
| एकूण | | ५० |
| **एकूण अ + ब - १००** | | |

४. आता सुरजागड येथील **१) नेंडेर व २) येलचील** या ०२ सशस्त्र पोलीस मदत केंद्रासाठीच्या आस्थापनेवरील उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या नव्याने निर्माण केलेल्या १०० अस्थायी पदांना **दिनांक ०१ मार्च, २०२६ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत** खालील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त पदे वगळून उर्वरित पदांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच पदे ज्या कारणास्तव ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर केली आहेत, त्याचे पालन करण्यात यावे.

५. उपरोक्त खर्च "मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस-१०९, जिल्हा पोलीस-१०९(००) (०१) जिल्हा पोलीस बल"या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दिनांक २८.०२.२०२६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२७१८५५३८४२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.03.27 18:56:34 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र,कॅम्प.
३) जिल्हाधिकारी,गडचिरोली.
४) पोलीस अधीक्षक, गडचिरोली.
५) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई .
६) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
९) वित्त विभाग (व्यय-७) / वित्तिय सुधारणा-१.
१०) निवड नस्ती, पोल-३.